गुरुवार, दि. १९ जून २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक ३१४ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४

8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## पुलाअभावी वाहत्या पाण्यातून शेतकऱ्यांचा जीवघेणा प्रवास

### ‘त्या’ घटनेनंतरही प्रशासनाला जाग येईना

**विशाल देशमुख**

**जाफराबाद** - तालुक्यातील अकोलादेव येथे शेतकऱ्यांना शेतात येण्या जाण्यासाठी खंडोबाचा ओढा ते शिराळा बुटखेडा या रस्त्यावर पुल नसल्याने पुराच्या पाण्यात जीव धोक्यात घालून वाट शोधावी लागत आहे. या खंडोबाच्या ओढ्या पलीकडे अनेक शेतकऱ्यांच्या जमीनी आहे. तसेच हा अकोलादेव, बुटखेडा शिराळा हा जुना जवळचा मार्ग असल्याने अनेक शेतकरी, शेतमजूर, नागरीक या रस्त्याने ये-जा करतात.

पावसाळ्यात हा ओढा दुथडी भरून वाहत असतो. याच पुराच्या पाण्यातून शेतकऱ्यांना ये-जा करावी लागते. या ओढ्यावर पुल बांधण्यासाठी शासन दरबारी अनेक वेळा मागणी करून सुध्दा प्रशासनाला अजून पाझर फुटायला तयार नाही. सन २०१३ मध्ये याच ओढ्याच्या पाण्याच्या प्रवाहात चार महीला वाहून जात असतांना अकोलादेव येथील नागरिकांच्या सतर्कतेमुळे या महीलांचे प्राण वाचले होते. यावेळी तत्कालीन तहसीलदार यांनी पाहणी करून येथे पुल तयार करावा यासाठी शासनाला कळविले होते. पण प्रशासनाने पान २ वर

अनेक वर्षांपासून हा पुल बांधण्यासाठी शासन दरबारी पाठपुरावा केला होता. व तत्कालीन तहसीलदार जाफराबाद यांनी महिला वाहून जाण्यासंदर्भातील घटना शासनाकडे कळून सुध्दा उपयोग झाला नाही.

**- चेअरमन गणेश सवडे.**

अकोलादेव ते बुटखेडा, शिराळा या रस्त्याला क्रमांक मिळाला असून शासनाने या रस्त्याला मंजुरी देऊन तात्काळ पुलाचे व रस्त्याचे काम चालु करावे.

**- पंचायत समिती सदस्य दादाराव सवडे**



## आकणी-बरबडा प्रकल्पासह आकणी गावाच्या पूनर्वसनाचा प्रश्नही मार्गी!

### आ. बबनराव लोणीकरांच्या मागणीवर मंत्री विखे पाटलांचा सकारात्मक प्रतिसाद

जालना । प्रतिनिधी - माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी परतूर विधानसभा मतदारसंघातील विविध प्रश्नांच्या बाबतीत मंत्रालयातील विविध मंत्र्यांना पत्राद्वारे लेखी स्वरुपात कळवले होते. त्या पत्राला प्रतिसाद देत गोदावरी व कृष्णा खोरे चे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी प्रतिसाद देत संदर्भीय पत्रांची दखल घेतली आहे. पुढील कारवाईसाठी आपले पत्र पाठवण्यात आले असल्याचे मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी आ. लोणीकर यांना दिलेल्या पत्रात नमूद केले आहे. त्यामुळे आता आकणी-बरबडा प्रकल्पासह आकणी गावाचे पूनर्वसाचा प्रश्नही लवकरच मार्गी लागणार आहे.

आमदार बबनराव लोणीकर यांनी मराठवाडा मुक्ती संग्राम दिन अमृत महोत्सवी वर्ष साजरे करत असताना परतूर विधानसभा मतदार संघातील गेल्या वीस वर्षापासून रखडलेल्या मंठा तालुक्यातील बरबडा- आकणी बृ.ल.पा.प्रकल्पाचे काम ८०% च्या वर पूर्ण झालेले असून, केवळ कंदर भरणी चे काम बाकी आहे. या धरणाचे काम पूर्ण करण्या बाबतीत अद्याप पर्यंत कुठलीही कार्यवाही झालेली नाही तसेच आकणी गावाचे पुनर्वसन करणे अद्याप बाकी असून यासंदर्भात तात्काळ कार्यवाही करत नवीन प्रसाकीय मान्यता देऊन सदरील प्रकल्पाची कंदर भरणी करून प्रकल्पाचे काम पूर्ण करण्यासाठी निधी उपलब्ध करून द्यावा अशी विनंती आमदार बबनराव लोणीकर यांनी दिनांक १७.०३.२०२५ रोजी राधाकृष्ण विखे पाटील यांना दिलेल्या पत्रात केली होती

परतूर तालुक्यामधील आंबा येथील दुधना नदीवरील कोल्हापुरी बंधारा व मंठा तालुक्यातील पूर्णा नदीवरील वाघाळा-टाकळखोपा, तळणी व देवठाणा-उस्वद असे एकूण ०४ कोल्हापुरी बंधारे गेल्या दहा वर्षापूर्वी फुटलेले असून या दोन्ही नदी पात्रांची क्षमता खूप मोठी आहे व पाण्याचा वेग प्रचंड मोठा असल्यामुळे सदरील कोल्हापुरी बंधाऱ्याची केवळ डागडूजी व दुरुस्ती न करता या बंधाऱ्याचे रुपांतर उच्च पातळी बंधाऱ्यात केल्यास अधिकाधिक फायदा परिसरातील शेतकरी बांधवासह पिण्याच्या पाण्यासाठी होईल. तरी सदरील बंधाऱ्याची उच्च पातळी बंधाऱ्यात रुपांतर करून तात्काळ निधी उपलब्ध करून देण्यात यावी अशी विनंती आमदार बबनराव लोणीकर यांनी जलसंपदा मंत्री विखे पाटील यांना केली होती या मागणीला देखील विखे पाटील यांनी सकारात्मक प्रतिसाद दर्शवत पुढील कारवाईसाठी पाठवण्यात आला आहे



असा लोणीकरांशी पत्रव्यवहार केला आहे

मंठा व परतुर तालुक्यातील निम्न दुधना प्रकल्प लगत असलेल्या जलसंपदा विभागाच्या अंतर्गत येणाऱ्या प्रजिमा - १३ ते केदार वाकडी ते सातोना सेलू रोड ग्रामा - ४० कि. मी. ०/०० ते ९/०० पूलासह रस्त्याचे बांधकाम करणे कामासाठी तात्काळ मंजुरी सह १० कोटी रु. निधी उपलब्ध करून देण्यात यावा अशी विनंती लोणीकरांच्या वतीने करण्यात आली होती. लोणीकरांच्या या मागणीची दखल घेत तात्काळ पुढील कारवाईसाठी पुढे पाठवण्यात आले असल्याचे मंत्री विखे पाटील यांनी लोणीकरांना दिलेल्या पत्रात म्हटले आहे.

युवा आदर्श

### सुस्वागतम् ...

एकनिष्ठ सोडून घरचे
बाहेरच्यांचे सुस्वागत
कैक वर्षे झाले तरीही
पक्ष अजूनही अबर्गत
जमवून घेई सूरताल
मैफिलीत येते रंगत
यश सांघिक चांगले
महत्वपूर्ण असे संगत
घरचे होत नाही कधी
शेवटी तसे अभ्यागत
अपेक्षित बाह्य मदत
विवाद सरेना अंतर्गत
पक्षांतर शाप सर्वांस
आपले होती अपगत
आपले उपरे हो सारे
रहालंदुजास बिलगत
नवीन जोडण्यां नादात
स्थिरपक्ष हो अस्तंगत
हार पत्करावया लावे
प्रतिपक्ष असे पारंगत
सत्य ओळखा वेळेत
इरादे राहती स्वप्नवत
बाकीचे सगळे वेगळे
महत्वाचे अंति जनमत

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

**झाडे लावा**
**झाडे जगवा**

## आत्म्याशी परमात्म्याचे नाते जोडल्यास सर्व समस्यांचे समाधान- प्रो. गिरीश

### ब्रह्माकुमारीजच्या तीन दिवसीय ‘आनंदी जीवन’ शिबिराने दिली नवचैतन्याची प्रेरणा

**जालना । प्रतिनिधी -** जीवन आनंदमय करण्यासाठी मानसिक स्पष्टता, आत्मिक जागरूकता आणि सकारात्मक जीवनशैली अत्यावश्यक गरज आहे. ताण येत नाही, असा एकही व्यक्ती सापडून मिळणार नाही. तणाव मुक्तीसाठी आत्म्याशी परमात्म्याचे नाते जोडा. त्यामुळे सर्व समस्यांचे निराकरण होईल आणि तणावमुक्त जीवन जगणे सोपे बनेल, असे मौलिक आणि प्रभावी विचार प्रसिद्ध प्रेरणादायी वक्ते प्रो. ई. व्ही. गिरीश यांनी येथे बोलताना व्यक्त केले.

ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाच्या जालना येथील राजयोग भवन येथे १४ ते १६ जूनदरम्यान आयोजित आनंदी जीवन कसे जगावे? या तीन दिवसीय शिबिरात तणावाला सामोरे जाण्याची कला, आत्मविश्वासाने जगण्याचा मंत्र आणि राजयोग मेडिटेशनने आत्मिक परिवर्तन या तीन मुद्द्यांवर प्रो. गिरीश यांनी केलेले मार्गदर्शन श्रोत्यांच्या मनाला भिडले.

पहिल्या दिवशी तणाव - जीवनातील सर्वात मोठी अडचण या विषयावर बोलताना प्रो. गिरीश यांनी सांगितले की, तणाव हा बहुधा परिस्थितीमुळे नसतो, तर आपल्या प्रतिक्रियेमुळे निमार्ण होतो. राजयोगाच्या सहाय्याने मनाला केंद्रित करणे आणि पान २ वर





## संपादकीय

# आषाढी वारी; महाराष्ट्राचा लोकोत्सव!

आषाढ महिना सुरू झाला की वेध लागतात ते पंढरीच्या वारीचे. लाखो वारकरी देहू आणि आळंदीत जमा होतात. डोईवर तुळशी वृंदावन व विठ्ठल रखुमाईच्या मूर्ती हाती टाळ मृदंग, मुखी विठ्ठल, विठ्ठल जयहरी विठ्ठलचा गजर करीत, ज्ञानोबा - तुकारामांचा जयघोष करीत व खांद्यावर भागवत धर्माची भगवी पताका फडकवीत विठुरायाच्या भेटीसाठी लाखो वैष्णवांचा मेळा निघतो हे दृश्य डोळ्यांचे पारणे फेडणारे असते. आषाढी वारी म्हणजे महाराष्ट्राचा लोकोत्सव! पालखी सोहळा हे महाराष्ट्राचे वैभव आहे. १३ व्या शतकात ही परंपरा असल्याचे उल्लेख सापडतात. संतश्रेष्ठ ज्ञानोबा माऊलींच्या घराण्यात पंढरीच्या वारीची परंपरा होती. त्यांचे वडील वारीला जात असल्याचा उल्लेख आढळतो. ज्ञानदेवांनी भागवत धर्माची पताका खांद्यावर घेऊन सर्व जातीपातीच्या समाजाला एकत्रितपणे या सोहळ्यात सामील करुन घेतले. हेच व्यापक स्वरूप जपत एकनाथ महाराज तुकाराम महाराज यासारख्या संतांनी वारीची परंपरा पुढे चालवली. गेली कित्येक वर्षे सुरू असलेली ही महाराष्ट्राची परंपरा आता देशातच नाही तर विश्वात लोकप्रिय झाली आहे. संपूर्ण महाराष्ट्रातून वारकरी व भाविक वारीमध्ये सहभागी होतात. महाराष्ट्रातूनच नव्हे तर गुजरात, मध्यप्रदेश, आंध्रप्रदेश, कर्नाटक, तेलंगणा या राज्यातूनही लोक वारीमध्ये सहभागी होतात. आतातर परदेशातूनही लोक खास वारी अनुभवण्यासाठी महाराष्ट्रात येतात. दिवसेंदिवस वारीतील वारकऱ्यांची संख्या वाढत चालली आहे. १९६५ च्या सुमारास आळंदीच्या पालखीमध्ये पाच हजार वारकरी सहभागी झाल्याचा उल्लेख दि ब मोकाशी यांच्या पुस्तकात आढळतो. आज ती संख्या लाखोंच्या घरात पोहचली आहे. वृद्धांप्रामाणे तरुणही आता वारीत सहभागी होत आहेत. सहकुटूंब वारी करणाऱ्यांची संख्याही वाढली आहे. कुठलीही जाहिरात न करता, मार्केटिंग न करता लाखो भाविक वारीत सहभागी होतात. वारी म्हणजे नियोजनाचे सर्वोत्तम उदाहरण! मार्च महिन्यातच दिंडीचे नियोजन होते. दिंडीतील सहभागी वारकरी, आचारी, शिधा, मुक्कामाची सोय याचे सर्व नियोजन मार्च महिन्यातच होते. मार्च महिन्यात सुरू झालेले हे दिंडीचे नियोजन दिंडी पुन्हा गावी परत येण्यापर्यंतचे असते. वारीतील शिस्त तर काय वर्णवावी! कोठेही गडबड गोंधळ नसतो. स्वयंशिस्तीने चालणाऱ्या वारकऱ्यांना आस असते ती केवळ विठुरायाच्या भेटीची ! लाखो वारकरी एकत्रित असूनही त्यांच्यातील शिस्त कधी बिघडत नाही. त्यांची शिस्त समाजाला दिशा देणारीच असते. पालखी मार्गावर पालख्यांचे दर्शन घेण्यासाठी हजारो भाविक उभे असतात. साधू संत येती घरा.... तोचि दिवाळी दसरा..... ! ही भावना त्यामागे असते. अनेक सेवाभावी संस्था दिंडीतील वारकाऱ्यांसाठी फराळ व आहाराचे वाटप करतात. शासन स्तरावरुन देखील पालख्यांचे योग्य नियोजन केले जाते. पिण्याच्या पाण्याची व मुक्कामाची योग्य सोय केली जाते. वारी दरम्यान गृह विभागाकडून चोख सुरक्षा व्यवस्था पुरवली जाते. आरोग्य विभाग वारकऱ्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी तत्पर असते. तज्ज्ञ डॉक्टरांचे पथक कायम वारकऱ्यांच्या सेवेसाठी उपलब्ध असते. आतातर नेटकरी नेटवरही वारीचे अपडेट देत असतात. फेसबुक, ट्विटर सारख्या सोशल मीडियावर देखील आता वारीचा अनुभव घेता येतो. त्यामुळे वारीदेखील आता ग्लोबल झाली असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# पोलादपूर तालुका अविकसित यापुढच्या काळात ही ओळख पुसुया!

## मंत्री भरतशेठ गोगावले आणि प्रवीण दरेकर यांची ग्वाही

**मुंबई । प्रतिनिधी -** सत्कारापेक्षा आम्ही तुम्हाला काहीतरी देण्यासाठी आलो आहोत. आम्ही दोघेही खेडेगावात जन्मलो आहोत, रानावनात हिंडलो आहोत. मोठे झालो असलो तरी जमिनीवरून चालणारे आहोत. आपल्या तालुक्यातील डोंगर, दऱ्याखोरी, वाटा आम्ही धुंडाळल्या आहेत त्यामुळे आपले प्रश्न काय आहेत याची आम्हाला नव्याने ओळख करून द्यायची गरज नाही. तेव्हा आमच्या दोघांच्याही सत्तेच्या पदाचा लाभ या तालुक्याला व्हावा असे आम्हाला वाटते आहे. यापुढच्या काळात आपण सर्वांनी आपल्या पोलादपूर तालुक्याची अविकसित तालुका ही ओळख पुसूया अशी ग्वाही राज्याचे रोजगार हमी व फलोत्पादन मंत्री भरतशेठ गोगावले यांनी पोलादपूरवासियांना दिली.

मुंबई-ठाणे येथील पोलादपूरवासियांच्या वतीने घाटकोपर मुंबई येथे स्नेहसंमेलन आयोजित करण्यात आले होते त्याप्रसंगी सत्काराला उत्तर देताना भरतशेठ गोगावले बोलत होते. भरगच्च गर्दी झालेल्या या सभागृहात पोलादपूरचे सुपुत्र आणि बहुचर्चित छावा या चित्रपटाचे दिग्दर्शक लक्ष्मण उतेकर यांचा नागरी सत्कार आयोजित करण्यात आला होता. त्याचप्रमाणे रोजगार हमी व फलोत्पादन, खारभूमी विकास मंत्री भरतशेठ गोगावले आणि पोलादपूरचे सुपुत्र असलेले विधानपरिषद गटनेते आणि मुंबई जिल्हा बँकेचे अध्यक्ष आमदार प्रवीण दरेकर, राष्ट्रपती पदक प्राप्त वरिष्ठ पोलीस निरीक्षक मुंबई संजीव धुमाळ (पोलादपूर), गुहागरचे मुख्याधिकारी असलेले स्वप्निल पांडुरंग चव्हाण (महाळुंगे), डॉ. नेहा विलास शिरावले BHMS (रानवडी), निलेश मारुती जाधव B..L.L.B Mumbai (ओंबळी) यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी भरतशेठ पुढे असेही म्हणाले की, तालुक्यातील प्रत्येक वाडीवस्तीवर बारमाही पाणी कसे देता येईल यासाठी तालुक्यात तीन धरणांचा प्रकल्प आम्ही हाती घेतला आहे. अगोदर तालुका टँकरमुक्त झाला पाहिजे अशी आमची भूमिका आहे. सर्वात मोठे धरण लहुळसे येथे होत आहे ते झाल्यानंतर अनेक प्रश्न मार्गी लागणार आहेत. आपण पोलादपूर तालुकावासीयांना शिवकाळापासून ऐत्याहासिक वारसा लाभला आहे. छत्रपती शिवाजी महाराज, संभाजी महाराज, नरवीर तान्हाजी मालुसरे, मुरारबाजी देशपांडे, परमानंदबाबा कृष्णाजी सोनावणे, कांगोरीगड, चंद्रगड असा समृद्ध इतिहास आपल्याकडे आहे, रायगड किल्ला हाकेच्या अंतरावर आहे. तुम्ही कुठल्याही तीर्थक्षेत्री जा, परंतु जन्मला आलात तर एकदा तरी रायगडला भेट देऊन शिवरायांच्या समाधीला वंदन करा.

आमदार आणि विधानपरिषदेतील गटनेते प्रवीण दरेकर तालुकावासीयांसमोर भाषण करताना म्हणाले की, आपल्या मातीतला माणूस म्हणून छावाचे दिग्दर्शक लक्ष्मण उतेकर, कॅबिनेट मंत्री ना. भरतशेठ गोगावले आणि माझा आज आपण सत्कार करीत आहात. आपल्या मातीतून जी मोठी माणसे झाली आहेत त्यांचा सत्कार होतो आहे. यातून तुमचा अभिमान तुमचा स्वाभिमान आणि ओसंडून वाहणारा आनंद दिसतो आहे. आम्हालाही आयुष्यात अडचणी आल्या होत्या. खडतर परिस्थितीतून आम्ही संघर्ष करून त्यावर मात केली आणि आज मोठे झालो आहोत. सत्कार हा विचारांचा होत असतो. ज्यांचा सत्कार केला त्याचे कार्य हे समाजाला दिशादर्शक आहे. आज होणाऱ्या कार्यक्रमाच्या माध्यमातून यापुढच्या काळात आपण सर्व तालुकावासीय जातीपातीच्या पलीकडे जाऊन एकत्र येऊया, या कार्यक्रमानंतर जिद्दीने उठा. पोलादपूर तालुका हा अविकसित किंवा मागासला आहे हे बिरुद पुढच्या काळात पुसून टाकुया. आजही आपण रस्त्यावर खडी टाका, पाण्याची लाईन टाका, सभामंडप द्या अशा भौतिक मागण्या करीत असतो. यापेक्षा खेडेगाव सोडून शहरात जाणाऱ्या तरुणाला गावातच कसा थांबवता येईल असा विचार करून यापुढे शिक्षण, उद्योगधंदे, व्यवसाय याकडे लक्ष द्यायला हवे. त्याचप्रकारची विकासाची भाषा आपण बोलायला हवी. मी राज्यातल्या मोठ्या बँकेचा अध्यक्ष आहे महाराष्ट्रभरच्या प्रकल्पाना मी आर्थिक मदत करीत असतो. परंतु माझ्या तालुक्यातून कुणीही येत नाही हे दुःख आहे. काहीतरी करायचे असे धाडस असलेल्या तालुक्यातील ५ तरुणांनी पुढे या मी नक्की मदत करील. कार्यक्रम फक्त सत्कारापुरता न राहता आजपासून तालुक्याच्या विकासाची चळवळ उभी राहिली पाहिजे. तालुक्याला आणि होतकरू तरुणांना दिशा देणारा हा कार्यक्रम ठरावा अशी प्रवीण दरेकर यांनी अपेक्षा व्यक्त केली.



ज्येष्ठ इतिहास संशोधक आणि दुर्गतपस्वी बाळकृष्ण सदाशिव तथा आप्पा परब हे कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे होते. ते आपल्या भाषणात म्हणाले, कसे जगावे हे छत्रपती शिवाजी महाराजांनी शिकवले, कसे मरावे हे छत्रपती संभाजी महाराजांनी शिकवले, तर उत्तरेकडून आलेले हिरवे वादळ कसे रोखावे हे राणी ताराबाई यांनी स्त्री शक्तीची ताकद दाखवून शिकवले. त्यामुळे नुसते जगण्यापेक्षा काहीतरी कर्तृत्व करुन जगा. इतिहासाचा अभ्यास करण्यासाठी तुमच्याकडे सुक्ष्मदर्शी दृष्टीकोन असायला हवा. इतिहासाच्या प्रत्येक गोष्टीत काही कारणे लपलेली आहेत. ही याच दृष्टीकोनातून पहिली तर उलगडत जातात. प्रत्येकाने जीवनात असे काहीतरी कर्तव्य करावे, ज्यामुळे देशाचे, समाजाचे, संस्कृतीचे आणि स्वतःच्या घराण्याचे नाव उज्वल होईल. नुसते जगण्यापेक्षा काहीतरी कर्तृत्व दाखवून स्वतःला अजरामर करा,

सत्काराला उत्तर देताना लक्ष्मण उतेकर म्हणाले, माझ्या मातीतल्या माणसांनी मायेने हा सत्कार केला आहे. त्यामुळे मी अभिमानाने सांगेन माझे सत्कार भरपूर झाले परंतु असा सत्कार कुठेही झाला नाही. कोरोना काळात संभाजी महाराजांचा इतिहास मी ज्यावेळी वाचला तेव्हा या चित्रपटाचे बीज माझ्या मनात रोवले गेले. संभाजी महाराजांचे चरित्र अनेकांनी डागाळले आहेत. परंतु शहेनशहा औरंगजेब जेव्हा दिल्लीचे तख्त सोडून शंभू महाराजांचा बंदोबस्त करण्यासाठी स्वतः महाराष्ट्रात येतो. शंभू राजांना पकडल्यानंतर त्यांचे हालहाल करतो, तुकडे तुकडे करतो. मनातली भीती जात नाही म्हणून त्यांच्या शरीराचे तुकडे वेगवेगळ्या ठिकाणी टाकतो. हे अभ्यासल्यानंतर औरंग्याला पराक्रमी संभाजी राजे कळले होते परंतु महाराष्ट्राच्या मातीला त्यांचे मोठेपण, शौर्य, पराक्रम कळले नाही.

राष्ट्रपती पारितोषिक प्राप्त वरिष्ठ पोलीस अधिकारी संजीव धुमाळ साहेब सत्काराला उत्तर देताना म्हणाले की, या सत्काराच्या माध्यमातून तालुक्यासमोर अनेक झाकली माणके समोर आणण्याचे काम संयोजक करीत आहेत, देशाच्या राष्ट्रपतींनी माझा सत्कार केला तोच आनंद मला पुन्हा मिळत आहे की, माझे तालुकावासीय एकत्र येऊन आमचे कौतुक करीत आहेत. लक्ष्मण उतेकरांची चित्रपटाची केलेली मांडणी तर वाखाणण्यासारखी आहे. या चित्रपटाला मिळालेल्या यशाने आपल्या सर्वांची छाती अभिमानाने फुलून येते.

संयोजक सुभाष पवार यांनी आपल्या प्रास्ताविकात संमेलनाच्या आयोजनामागचा हेतू सांगितला. पोलादपूर तालुक्यात वेगवेगळ्या क्षेत्रात अनेक तरुण उच्च स्थानावर विराजमान आहेत, त्यांचा गुणगौरव आणि परिचय मोठ्या व्यासपीठावरून समाजाला व्हावा त्याचप्रमाणे तालुक्याचे महत्वाचे प्रश्न समोर यावेत. त्यांची सोडवणूक व्हावी यासाठी हा प्रयत्न आहे. तालुक्यातील अनेक कार्यकर्त्यांनी आर्थिक सहभागासह मेहनत घेतली त्यामुळे आम्ही यशस्वी झालो आहोत असे वाटते आहे. कार्यक्रमाची सुरुवात सुप्रसिद्ध गायक दिलीप गोळपकर यांच्या सरगम ऑन द ट्रॅक याने झाली. ज्येष्ठ साहित्यिक आणि नाटककार प्रल्हाद जाधव आणि आदेश मालुसरे यांनी मुलाखतीद्वारे लक्ष्मण उतेकर यांच्या जीवनातील संघर्ष आणि यश हे उलगडून दाखविले.

पोलादपूर तालुका हा वारकऱ्यांचा तालुका म्हणून तालुक्यातील सन्माननीय सर्वश्री गुरुवर्य ह भ प गुरुवर्य ह भ प श्री. अरविंदनाथ महाराज (मठाधिपती गणेशनाथ महाराज संस्थान), गुरुवर्य ह भ प श्री. गणपत महाराज मोराणकर (श्रीगुरु आजरेकर फड सांप्रदाय कोकण विभाग अधिष्ठान प्रमुख), ४२ वर्षे पोलादपूर ते आळंदी पायीवारीचे अधिष्ठान प्रमुख ह भ प गुरुवर्य श्री. लक्ष्मण महाराज मालुसरे, ह भ प गुरुवर्य श्री. रघुनाथदादा मोरे (हनुमंतबाबा मोरे सांप्रदाय अधिष्ठान प्रमुख), सुप्रसिद्ध ज्येष्ठ गायक भाजनानंदी ह भ प हरिभाऊ रिंगे महाराज यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

यावेळी व्यासपीठावर कृष्णा मा. कदम (अध्यक्ष वैद्यकीय कक्ष पोलादपूर), सुनिल मोरे (अध्यक्ष, नाईक मराठा समाज पोलादपूर), रामचंद्रशेठ कदम (उद्योजक, शासनाच्या उद्यानपंडीत पुरस्काराने सन्मानित), रवींद्र मालुसरे (अध्यक्ष, मराठी वृत्तपत्र लेखक संघ, मुंबई), कोंडीराम पार्टे (अध्यक्ष, मराठा समाज बडोदे), अशोक सिलीमकर (उपाध्यक्ष, मराठा समाज बडोदे), विजय उतेकर (अध्यक्ष, उतवेश्वर १५ गाव एकता संघ खेड रत्नागिरी) हे उपस्थित होते. स्नेहसंमेलन समितीचे किशोर ना. जाधव, संजय उतेकर, बाजीराव मालुसरे यांच्या नेतृत्वाखाली कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी अनेक कार्यकर्त्यांनी विशेष मेहनत घेतली.

पान १ वरुन

### पुलाअभावी ....

या घटनेला गांभीर्याने घेतले नाही. तात्पुरते नळकांडी टाकून मोकळे झाले होते. दुसऱ्याच वर्षी हे नळकांडे वाहून गेले. अद्यापही हा पुलाला मंजुरी मिळाली नाही.

हा पुल मंजुर व्हावा यासाठी गटशेती प्रमुख लक्ष्मण सवडे, चेअरमन गणेश बापु सवडे, माजी पंचायत समिति सदस्य दादाराव सवडे, माजी सरपंच रघुनाथ कदम यांच्यासह शेतकऱ्यांनी मागणी केली होती. पण मात्र या रास्त मागणीला निगरगठ्ठ अधिकाऱ्यांनी केराची टोपली दाखवली. शासन अजून पुराच्या पाण्यात वाहून जाणाऱ्यांची वाट पाहणार आहेत का? असा सवाल शेतकरी करीत आहेत.

सदरील शेत रस्त्यावर अनेक दिवसापासून शेतकरी पुलाची मागणी करत आहे पण या मागणीकडे कोणीही लक्ष देत नाही १२ वर्षांपूर्वी याच ओढ्यात महिला वाहून जाताना शांताबाई पाटोळे यांनी त्यांचे प्राण वाचवले होते. शासन व्यवस्था जर या ठिकाणी काही दुर्घटना झाल्यावरच पुलाचे काम मनावर घेणार तर नक्कीच ही व्यवस्था गेंड्याच्या कातडीची झाली अस म्हणायला हरकत नाही.शासनाच्या संबंधित विभागाने लवकरात लवकर दखल घेऊन या पुलाचे काम तत्काळ करून शेतकऱ्यांची होणारी तारांबळ आणि कसरत थांबवावी. अशी मागणी अकोलादेव येथील नागरिक समाधान हरी सवडे यांनी युवा आदर्शच्या प्रतिनिधीशी बोलतांना केली.

### आत्म्याशी परमात्म्याचे ...

विचारांना शांतीच्या दिशेने वळवणे हे तणावमुक्त जीवनाचे रहस्य आहे. दुसऱ्या दिवशी स्वतःमधील नायकाला ओळखा या विषयावर त्यांनी आत्मचिंतनाच्या माध्यमातून श्रोत्यांना अंतर्मुख केले. प्रत्येकामध्ये एक विलक्षण क्षमता दडलेली असते, पण ती ओळखण्यासाठी आत्मबोध आणि स्वस्वरूपाशी प्रामाणिक संवाद आवश्यक आहे.आत्मशक्तीची ओळख आणि त्यातून निर्माण होणारा अंतःप्रकाश, हेच आनंदी जीवनाचे खरे सूत्र आहे, असे त्यांनी नमूद केले. तिसऱ्या आणि अंतिम दिवशी त्यांनी राजयोग मेडिटेशनच्या आधारे आत्मिक परिवर्तन या विषयावर अतिशय संवेदनशील मार्गदर्शन केले. राजयोग केवळ ध्यान नव्हे, तर तो आत्मा आणि परमात्म्यातील संबंधाची अनुभूती देणारी प्रक्रिया आहे. त्यामुळे व्यक्तिमत्त्वात सहज परिवर्तन घडते, असे त्यांनी स्पष्ट केले.

प्रो. गिरीश यांनी त्यांच्या सहज, अनुभवसंपन्न शैलीत सायको-नेरोबिक्स, सकारात्मक संकल्पना आणि आत्मशक्ती जागृतीचे विवेचन करून उपस्थित श्रोत्यांमध्ये नवचैतन्य निर्माण केले. या तीन दिवसांच्या शिबिरात नागरिक, शिक्षक, व्यावसायिक, विद्यार्थी, गृहिणी अशा विविध स्तरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.

या प्रसंगी शिवरतन मुंदडा, श्याम शेलगावकर, ज्ञानदेव पायगव्हाणे, सुषमा पायगव्हाणे, दीपक बोधे, अंकुशराव राऊत, आर. आर. खडके, सुनिता सहानी, नारायण डागा , ज्योती सिंह, डॉ. शिल्पा मणियार, आशा चिलके, कविता नरवडे, भावना शाह, सीमा दाडे आदींसह व्यापारी, उद्योजक, डॉक्टर्स, मान्यवर आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. विशेष परिश्रम घेतले.

शिबिराच्या यशस्वीतेसाठी बऱ्हाणपूर झोनप्रमुख ब्रह्माकुमारी मंगला दीदी, शितल दीदी, सर्व केंद्रातील दीदी यांच्यासह कल्पना लाहोटी, सुनील लाहोटी, लक्ष्मीनारायण मानधना, डॉ. सतीश मोरे, मनोज जयस्वाल, अभय सहानी, भारती मोरे, छाया डागा, वीणा साबू आदींनी विशेष परिश्रम घेतले.

# मोफत सर्वाइकल कॅन्सर लसीकरणासंदर्भात जालन्यातील शाळांमध्ये जनजागृती मोहीम

**जालना । प्रतिनिधी -** कॅन्सर पेशंट एड असोसिएशन, मुंबई यांच्या सहकार्याने लायन्स क्लब जालना आणि सिव्हील क्लब जालना यांच्या संयुक्त विद्यमाने आझाद मैदानजवळील सिव्हील क्लबमध्ये २४ जून रोजी ९ ते १८ वयोगटातील मुलींसाठी मोफत सर्वाइकल कॅन्सर प्रतिबंधक लसीकरण करण्यात येणार असून, प्रत्येक शाळांमध्ये लसीकरणाबाबत जनजागृती केली जात आहे.

बुधवार दि. १८ जून रोजी या अभियानाच्या अनुषंगाने देऊळगावराजा रोडवरील राष्ट्रीय हिंदी विद्यालयाचे मराठी व इंग्रजी माध्यम, सीटीएमके गुजराती विद्यालयात आयोजित कार्यक्रमाला उस्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी ९५० मुलींना सर्वाइकल कॅन्सरबाबत माहिती देण्यात येऊन लसीकरण करून घेण्याचे आवाहन करण्यात आले



यावेळी मार्गदर्शक म्हणून वीरा मेडीसीटी हॉस्पिटलच्या कॅन्सर तज्ज्ञ डॉ. प्रणौती हीरळकर तर प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रीय हिंदी विद्यालयाचे मुख्याध्यापक मनीष अग्रवाल, इंग्रजी माध्यमच्या प्रिन्सिपल रीता टंडन, उपमुख्याध्यापक गिरीश दशरथ, शिक्षिका लीना काळे, अनीता नागोरी, जयंत केन्द्रे, लायन्स क्लबच्या सचिव मंजु श्रीमाली, अतुल लड्ढा, विठोबा दराडे, पी. के. खरात, बळीराम बेन्द्रे, डॉ. संगीता श्रोत्रिय, योगेश डाके आदी उपस्थित होते.

डॉ. हिरळकर यांनी विद्यार्थिनींशी संवाद साधून सर्वाइकल कॅन्सर म्हणजे काय, तो कशामुळे होतो आणि त्यापासून बचाव करण्यासाठी लसीकरण किती महत्त्वाचे आहे यावर सखोल माहिती दिली.

.गर्भाशयाच्या या आजाराबाबत महिला अनभिज्ञ असतात. यामुळे वेळेत निदान होत नाही. जर वयाच्या ९ ते १८ व्या वर्षी लस घेतली, तर भविष्यात गंभीर आजाराचा धोका मोठ्या प्रमाणावर टाळता येतो, असे सांगून डॉ. हीरळकर यांनी मुलींना योग्य वयात लसीकरण करून घेण्याचे आवाहन केले.

विद्यार्थिनींनी यासंदर्भात विचारलेल्या प्रश्नांना डॉ. हिरळकर यांनी उत्तरे दिली. यावेळी मुलींना संमतीपत्र वाटप करण्यात आले.

# युवकांनो कर्तव्याची जाण आणि जबाबदारीचे भान ठेवा

आजकालचे युवक आपले कर्तव्य आणि आपली जबाबदारी पूर्णपणे विसरून गेले आहेत. आणि नको त्या फालतू छंदात वेळ वाया घालवत आहेत. त्यांना स्वतःच्या कर्तव्याची जान आणि जबाबदारीचे भान जराही राहिले नाही. आपली जबाबदारी आणि आपले कर्तव्य काय आहेत? आणि आपण सध्या काय करत आहोत? याचा त्यांना विसर पडला आहे. म्हणूनच ते आपले कर्तव्य आणि जबाबदारी विसरून नको त्या दिशेला भरकटत जात आहेत. आणि स्वतःच्या पायावर स्वतःच्या हाताने धोंडा मारून घेत आहेत. आपल्याच हाताने आपलेच जीवन बरबाद करून घेत आहेत. वाईट व्यसनाच्या आहारी जाऊन स्वतःला व्यसनाच्या विखारी विळख्यात ओढत आहेत. दारू, सिगारेट व गांजा या जीवघेण्या व्यसनाच्या आहारी जाऊन स्वतःला विनाशाच्या उंबरठ्यावर नेत आहेत.आणि स्वतःच्या हाताने मृत्यूला जवळ करत आहेत. व्यसनी तरुणांचा देश ही भारताची नवी ओळख जगासमोर आली आहे. आपल्या भारतात मिसरूड न फुटलेले अगदी पाच ते सहा वर्षांची मुले देखील व्यसन करण्यात आघाडीवर आहेत. मग या नादात हे युवक कशाला कर्तव्याची जाण आणि जबाबदारीचे भान ठेवतील. शिक्षणाच्या नावाखाली आपल्या वडिलांकडून भरपूर पैसा मागवत आहेत आणि तो पैसा शिक्षणाला न लावता ढाब्यावर जाऊन मौज मजा करण्यात लावत आहेत. शिक्षण शिकायचे सोडून मवाली पोरांसोबत टवाळक्या करत फिरत आहेत. वाईट व्यसनाने नुसते बरबटून गेले आहेत.खरे तर युवकांनी तरुणपणात खूप खूप शिक्षण शिकून आपले जीवन ध्येय गाठायला हवे. शिक्षणाच्या जोरावर एखादी नोकरी काबीज करायला हवी.आई-वडिलांचे, गावकऱ्यांचे व समाज बांधवांचे स्वप्न साकार करायला हवे. नंतर सामाजिक बांधिलकी म्हणून किंवा सामाजिक कर्तव्य व जबाबदारी म्हणून युवकांनी स्वतः शिक्षित होऊन इतरांनाही शिक्षणाचे महत्त्व समजावून सांगावे, जेणेकरून ते युवक शिक्षणाच्या माध्यमातून समाजाला प्रगतीपथावर नेऊ शकतील. त्याचबरोबर युवकांनी पर्यावरणाचे महत्त्व ओळखून पर्यावरणाची जिवापाड काळजी घेणे हे देखील खूप महत्त्वाचे काम आहे. त्यांनी प्रदूषण कमी करण्यासाठी आणि पर्यावरणाची सुरक्षा करण्यासाठी सतत प्रयत्नशील असायला हवे. युवकांनी समाजात समता, बंधुता आणि न्याय प्रस्थापित करण्यासाठी लढा उभारायला हवा. आणि समाजातील अन्याय अत्याचार दूर करण्यासाठी अटोकाट प्रयत्न करायला हवेत. युवकांनी आपल्या कला आणि कौशल्याचा उपयोग समाजासाठी व देशासाठी करावा. युवकांनी एक जबाबदार नागरिक म्हणून समाजाच्या विकासात सक्रियपणे सहभाग नोंदवावा. युवकांनी समाजाला दिशा देण्यासाठी उत्तम नेतृत्वाची भूमिका पार पाडावी. तसेच नेहमी सकारात्मक दृष्टिकोन ठेवावा आणि समाजाला प्रेरित करावे.गोरगरीब, वंचित, उपेक्षित व तळागाळातील युवकांच्या शिक्षणाला थोडाफार हातभार लावावा. त्यांना शक्य होईल तेवढी आर्थिक मदत करावी. आणि त्यांना सुद्धा आपल्या बरोबरीला आणून त्यांच्या जीवनात आनंदाची व चैतन्याची मंगलमय पहाट आणावी. गोरगरीब, सर्वसामान्य व तळागाळातील मुलींच्या लग्नाला आर्थिक हातभार लावावा. अनाथांना व वृद्धांना आश्रमात जाऊन कपडे, भेटवस्तू व अन्नदान वाटप करावे. आपल्या आई वडिलांना सुखाचे व आनंदाचे क्षण दाखवावेत. त्यांना कष्टाची कामे करू देऊ नयेत. त्यांना खूप खूप जीव लावावा. विशेष करून उतारवयात त्यांची अधिक काळजी घ्यावी. त्यांना वेळेवर जेवण द्यावे आणि त्यांचा वेळेवर दवाखाना करावा.पत्नीचे ऐकून त्यांना अंतर देऊ नये. त्यांची हेळसांड करू नये. नाहीतर आजकाल शिकून नोकरीला लागलेले काही महाभाग पत्नीचे ऐकून आई-वडिलांना वृद्धाश्रमात पाठवत आहेत. त्यांना घाण घाण शिव्या देऊन घराबाहेर काढत आहेत.हे आपण सर्वजण डोळ्यांनी पाहत आहोत. म्हणून युवकांनो आपल्याला कळकळीची नम्र विनंती आहे की, आपण आई-वडिलांसोबत असे अमानुष प्रकार न करता, त्यांना गद्दार न होता आणि त्यांना वृद्धाश्रमाचा रस्ता न दाखवता त्यांना खूप खूप जीव लावूया, त्यांना अगदी आनंदात व मजेत ठेवून त्यांना सुखाचे दिवस दाखवूया कारण आई-वडिलांनी आपल्यासाठी खूप खूप खस्ता खाऊन व प्रसंगी सावकाराचे कर्ज काढून आपल्याला उच्च शिक्षण शिकवलेले असते. त्यांच्या जीवावरच तर आपला उच्च शिक्षणाचा डोलारा उभा असतो. हे आपण कधीच विसरता कामा नये. त्यांनी आपल्याला खूप खूप कष्ट करून आपल्या शिक्षणाला पैसा लावलेला असतो. आपण नोकरीला लागेपर्यंत त्यांना एकदिवस सुध्दा सुखाची झोप लागत नसते. मग आपण नोकरीला लागल्यावर आई-वडिलांना सुखात ठेवणे व म्हातारपणात त्यांचे योग्य पालन पोषण करणे हे आपले कर्तव्य व जबाबदारी असते. हे आजच्या युवकांनी लक्षात ठेवायला हवे. पण आजकाल कोण लक्षात घेतो? आजकाल नोकरीला लागलेले युवक सामाजिक बांधिलकी व जबाबदारी विसरून, आई-वडिलांना गावी ठेवून नोकरीच्या ठिकाणी स्थायिक होतात आणि तिकडेच पत्नीच्या आदेशाप्रमाणे जीवन जगतात. तिकडच्याच दुनियेत बायको लेकरांसोबत रममान होतात. समाज बांधवांना व आई-वडिलांना मदत करायची असते हे विसरून जातात. नेमके हेच डॉ. बाबासाहेबांना अपेक्षित नव्हते. डॉ. बाबासाहेब म्हणायचे की, लावलेला एक दिवा हजारो दिव्यांना प्रज्वलित करू शकतो. म्हणजे एक नोकरीला लागलेला समाज बांधव आपल्या हजारो बांधवांना आपल्या बरोबरीला आणू शकतो पण आजकालच्या लोकांची मानसिकता फार गढूळ झाली आहे. त्यांना वाटत आहे की, माझ्यासारखा उच्चपदस्थ अधिकारी दुसरा कोणीच होऊ नये, समाजात मलाच अधिक मान मिळावा, मीच भरपूर पैसा व संपत्ती कमवावी आणि इतरांनी फक्त माझ्याकडे बघत राहावे. साहेब, साहेब करत माझ्या मागे पुढे फिरावे.असे आजकालच्या नोकरदारांना वाटत असते. म्हणजे आजकालचे नोकरदार स्वार्थी व मतलबी झाले आहेत. त्यांना फक्त आपलेच भले व्हावे वाटत आहे. आणि इतरांचे वाटोळे व्हावे वाटत आहे. आपल्या महापुरुषांनी जर स्वतःचा स्वार्थ पाहिला असता तर ते आज खूप श्रीमंत झाले असते पण आज आपण कुठे असतो? कोणाच्या तरी दावणीलाच बांधलेले गुलाम असतो ना...याचा एकदा विचार करून बघा.



आपले महामानव स्वतः शिकले, मोठे झाले आणि समाजालाही मोठे केले आणि आपल्यालाही खूप खूप शिकून मोठे व्हा आणि आपल्याबरोबर समाज बांधवांनाही मोठे करा असे सांगून गेले. मग माझा आजच्या नोकरदारांना प्रश्न आहे की, आपण नोकरीला लागल्यावर किती लोकांना आपल्या बरोबरीला आणले? किती समाज बांधवांचा उद्धार केला? महापुरुषांच्या नावाचा डंका आजही संपूर्ण जगभर गाजत आहे. हे केवळ त्यांनी केलेल्या कार्यामुळेच! हे आजच्या नोकरदार वर्गाने मनोमन ध्यानात ठेवून थोडा विचार करायला हवा. आज या महापुरुषांना जाऊन कित्येक वर्षे झाली आहेत, तरी देखील हे महामानव समस्त भारतीयांच्याच नव्हे तर अख्या जगाच्या मनावर अधिराज्य गाजवत आहेत. आपण देखील स्वतःबरोबरच समाजाचा आणि देशाचा विचार केला तर नक्कीच आपण देखील मेल्यानंतर सुध्दा लोकांच्या मनावर अधिराज्य गाजवत राहाल.कारण बांधवांनो मेल्यावर आपल्याला काहीच सोबत घेऊन जायचे नाही, जसे रिकाम्या हाताने आलोय तसेच एकदिवस रिकाम्या हातानेच जावे लागणार आहे... म्हणून जीवनात असे काहीतरी ऐतिहासिक व अलौकिक कार्य करा की, मेल्यानंतरही तुमचे नाव एक चांगला व्यक्ती म्हणून पंचक्रोशीत आदराने निघत राहील...

**- बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी ता. अहमदपूर जिल्हा लातूर मो.७४९८७१५६६१**

# जमीर लेंगरेकर यांची नंदुरबार जिल्हा सह आयुक्तपदी पदोन्नती

## उल्हासनगर, सोलापूर, पनवेल मनपात उल्लेखनीय काम

**पनवेल । प्रतिनिधी -** कडेगावचे सुपुत्र उल्हासनगर महानगरपालिकेत अतिरिक्त आयुक्त म्हणून कार्यरत असलेले जमीर लेंगरेकर यांची पदोन्नतीवर नंदुरबार येथे जिल्हा सहआयुक्तपदी नियुक्ती झाली आहे. श्री. लेंगरेकर यांचा प्रशासकीय सेवेतील प्रदीर्घ अनुभव आणि उल्हासनगर, पनवेल व सोलापूर महानगरपालिकेच्या विकासात त्यांनी दिलेले महत्त्वपूर्ण योगदान यामुळे ते या नवीन पदासाठी योग्य न्याय देतील.

श्री. लेंगरेकर यांचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद शाळा कडेगाव व माध्यमिक शिक्षण रयतच्या महात्मा गांधी विद्यालयात झाले. डीएड करून कडेपूर कॉलेजमधून बीए पदवी घेतली. शिक्षक म्हणून शासकीय सेवेची सुरुवात केली. नोकरी करत स्पर्धा परीक्षेत यश मिळविले.

प्रशासकीय कारकिर्दीचा आढावा: श्री. लेंगरेकर यांनी यापूर्वी विविध महानगरपालिकांमध्ये महत्त्वाच्या जबाबदाऱ्या सांभाळल्या आहेत: शासकीय सेवेत येण्यापूर्वी ते २००३ पासून प्राथमिक शिक्षक म्हणून पाच वर्ष कार्यरत होते तदनंतर त्यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या २००५च्या परीक्षेत पहिल्याच प्रयत्नात यश मिळवून विक्रीकर निरीक्षक झाले व पाच वर्ष विक्रीकर खात्यात काम केले.

राज्यसेवा २०१२ च्या परीक्षेत यश म्हणून ते मुख्य अधिकारी गट-अ म्हणून निवडले गेले.

उल्हासनगर महानगरपालिका: २०१४ ते २०१७ या कालावधीत उपायुक्त म्हणून., पनवेल महानगरपालिका: २०१७ ते २०२० या काळात उपायुक्त म्हणून., सोलापूर महानगरपालिका: २०२०-२१ मध्ये उपायुक्त म्हणून., नगरपरिषद प्रशासन संचनालय: पदोन्नतीवर उपायुक्त म्हणूनही त्यांनी काम पाहिले आहे., फेब्रुवारी २०२२ ते फेब्रुवारी २०२५ या कालावधीत ते उल्हासनगर महानगरपालिकेत अतिरिक्त आयुक्त पदावर कार्यरत होते.

**उल्लेखनीय कामगिरी** श्री. लेंगरेकर यांनी त्यांच्या कार्यकाळात अनेक महत्त्वपूर्ण कामे केली आहेत, ज्यातून त्यांची कार्यक्षमता आणि दूरदृष्टी दिसून येते: उल्हासनगर महानगरपालिकेत उपायुक्त म्हणून: मालमत्ता कर वसुली आणि शिक्षण विभागाच्या कामकाजात त्यांनी मोठे बदल घडवले. त्यांच्याच कार्यकाळात पहिल्यांदाच २०१५ मध्ये महानगरपालिकेने शंभर कोटी रुपयांची कर वसुली केली. मनपाच्या शाळा आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभ्यासिका यांच्या बांधकामाला त्यांच्या उपायुक्तपदाच्या कार्यकाळात सुरुवात झाली.

पनवेल महानगरपालिकेची स्थापने पासून तीन वर्षाचे उपायुक्त म्हणून कार्यरत होते.

पनवेल महानगरपालिकेच्या जडंघटने त्यांनी महत्त्वाचे योगदान दिले. पनवेल महानगरपालिकेची प्रशासकीय घडी बसवण्यासाठी, आकृतीबंध मंजूर करण्यासाठी त्यांनी तत्कालीन आयुक्तांसोबत महत्त्वपूर्ण काम केले.

पनवेल महानगरपालिकेत कोरोनासाठीच्या वेळी परदेशातून येणाऱ्या नागरिकांसाठी व रायगड जिल्ह्यातून भारतातील अन्य भागात जाणाऱ्या कामगारांच्या सुविधासाठी त्यांनी सहकारांसोबत मोठी यंत्रणा सांभाळली. कोरोना साथीत अनेकांना त्यांनी मदत केली.

सोलापूर महानगरपालिकेत कोरोनाच्या दुसऱ्या त्यांनी तत्कालीन आयुक्त पी शिवशंकर यांच्या मार्गदर्शनाखाली साथरोग नियंत्रणाचे चांगले काम केले.

सोलापूर महानगरपालिकेचा अनेक वर्षा रखडलेला आकृतीबंध व सेवा प्रवेश नियम व कर्मचाऱ्यांची पदोन्नतीची प्रक्रिया मार्गी लावली.



अतिरिक्त आयुक्त म्हणून उल्हासनगर महानगरपालिका(२०२२ पासून): कोरोनानंतर आर्थिकदृष्ट्या अडचणीत सापडलेल्या उल्हासनगर महानगरपालिकेला पुन्हा रुळावर आणण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. अमृत योजनेंतर्गत पाणीपुरवठा आणि भुयारी गटार योजना मंजूर करून कार्यान्वित केल्या., मनपाच्या तीन नवीन शाळा आणि एक अभ्यासिका यांचे बांधकाम पूर्ण केले., जाहिरात परवाना विभागातील अनियमितता शोधून त्यांनी मोठा जाहिरात घोटाळा उघडकीस आणला.

प्रशासकीय शिस्त व लोकांच्या समस्या सोडवण्यासाठी सतत उपलब्ध राहण्याची त्यांची तळमळ यामुळे ते नियुक्तीच्या ठिकाणी नेहमीच लोकप्रिय राहिले आहेत.

लोकांना प्रशासकीय कामकाजासाठी हेलपाटे मारावे लागू नये म्हणून कामचुकार कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करणे, प्रशासकीय कामकाजात सोपेपणा आणण्याचा प्रयत्न केला. यातून त्यांना अनेक खोट्या प्रकरणात अडकवण्याचा प्रयत्न देखील केला होता. अशा संकटावर मात करून ते लोकांसाठी कार्यरत राहिले आहेत.

श्री. जमीर लेंगरेकर यांच्या नंदुरबार येथे जिल्हा सह आयुक्तपदी झालेल्या नियुक्तीमुळे जिल्ह्यातील प्रशासकीय कामकाजाला अधिक गती मिळेल अशी अपेक्षा आहे. नगर विकास विभागांतर्गत महाराष्ट्र शहरी प्रशासकीय सेवेतील एक अनुभवी व अभ्यासू अधिकारी म्हणून सुप्रसिद्ध असलेले लेंगरेकर हे आपल्या कामाच्या प्रति नेहमीच झोकून देऊन काम करतात. त्यांच्या मागील कामगिरीचा अनुभव पाहता, नंदुरबारच्या विकासातही त्यांचे मोलाचे योगदान राहील अशी आशा आहे.

# प्रा डॉ गणेश चंदनशिवे यांच्या सत्कार सोहळ्याचे आयोजन

**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** जाफराबाद येथील प्रा.डॉ गणेश चंदनशिवे यांना अखिल भारतीय नाट्य परिषदेचा सर्वोत्कृष्ट कलावंत पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचा छत्रपती संभाजीनगर येथे २९ जून रोजी विशेष सत्कार सोहळा आयोजित करण्यात आलेला आहे. मराठवाडा आर्ट कल्चर अँड फिल्म फाउंडेशन, महात्मा गांधी मिशन आणि अभ्युदय फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने सदर सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आलेले आहे. डॉ. गणेश चंदनशिवे हे मुंबईच्या लोककला अकादमीचे प्रमुख असून त्यांना यापूर्वी देखील राज्य आणि राष्ट्रीय स्तरावरील विविध पुरस्कार मिळालेले आहेत. महात्मा गांधी मिशनचे सचिव अंकुशराव कदम यांच्या हस्ते डॉ चंदनशिवे यांचा सत्कार करण्यात येणार असून यावेळी ज्येष्ठ अभिनेते डॉ .दिलीप घाटे, डॉ दिलीप महालिंगे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.




सत्कार सोहळ्यानंतर श्री चंदनशिवे आपल्या विशेष कलांचे सादरीकरण करणार आहेत. छत्रपती संभाजी नगर येथील रुक्मिणी सभागृहात आयोजित या सत्कार सोहळ्याला कलारसीकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन संयोजकांनी केले आहे.

# वरिष्ठ व निवड श्रेणीचे प्रशिक्षण पूर्ण केलेल्या शिक्षकांना १० दिवसाची अर्जित रजा मंजूर करा- शेख अब्दुल रहिम

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी -** राज्यातील शिक्षकांचे हक्क आणि कल्याण सुनिश्चित करण्यासाठी सतत प्रयत्नशील असलेल्या हॅपी टू हेल्प फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन हक्क संघटन चे राज्य प्रवक्ता शेख अब्दुल रहीम सर यांनी आज शिक्षण आयुक्त, शिक्षण संचालक, तसेच राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (डउएठढ) यांच्याकडे एक महत्त्वाचे निवेदन सादर केले आहे.



या निवेदनात त्यांनी सुलभक आणि प्रशिक्षणार्थी यांचे २६ मे ते १२ जून २०२५ दरम्यान झालेल्या वरिष्ठ व निवड वेतन श्रेणी प्रशिक्षण कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर, या प्रशिक्षणात सहभागी झालेल्या सर्व प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व अध्यापक विद्यालयातील शिक्षकांना १० दिवसांची अर्जित रजा मंजूर करून ती सेवापुस्तिकेत नोंदवावी अशी मागणी केली आहे.

हे प्रशिक्षण दीर्घ / उन्हाळी सुट्टीच्या कालावधीत घेण्यात आले असल्यामुळे, सुट्टीच्या वेळेसही शिक्षकांनी प्रशिक्षणास हजेरी लावून आपले कर्तव्य पार पाडले आहे.

त्यामुळे या प्रशिक्षणाचा मोबदला म्हणून रजा देणे न्याय्य ठरेल, असे शेख अब्दुल रहीम यांनी निवेदनात नमूद केले आहे.

ते पुढे म्हणतात की, ही मागणी महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ मधील नियम क्र. १६(१८) (अ) नुसार करण्यात आली असून, संबंधित सर्व जिल्हा परिषद व महानगरपालिकांतील शिक्षण अधिकाऱ्यांना यासंबंधी आवश्यक निर्देश देण्याची गरज आहे.

शिक्षकांच्या हक्कांसाठी आम्ही सदैव सजग आहोत. त्यांना योग्य न्याय मिळवून देणे ही आमची प्राथमिकता आहे, असेही शेख अब्दुल रहीम यांनी स्पष्ट केले.

हा निर्णय झाल्यास हजारो शिक्षकांना न्याय मिळेल आणि त्यांच्या सेवापुस्तिकेतील योग्य नोंदीसंदर्भात एक सकारात्मक पाऊल ठरेल, अशी शिक्षक वर्गाची आशा आहे.



# बिडी कामगारांची ५ महिन्यांची मजुरी थकली; जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**जालना । प्रतिनिधी -** येथील बिडी कामगारांची ५ महिन्यांची मजुरी मालकांनी थकवली आहे. त्यामुळे आम्हाला आमची मजुरी मिळवून द्या अशी मागणी बिडी कामगारांनी जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ यांच्याकडे केली आहे. याच मागणीसाठी बिडी कामगारांनी आंदोलन केले होते मात्र माजी आमदार कैलास गोरंटयाल यांनी मध्यस्थी करत हे आंदोलन स्थगित केले होते. गोरंटयाल यांच्या मध्यस्थीनंतर २ महिन्यांची मजूरी मजुरांना देण्यात आली होती. मात्र ७ पैकी केवळ २ महिन्यांची मजुरी मिळाली. पाच महिन्यांची मजुरी अद्यापही थकीत आहे त्यामुळे बिडी कामगार असलेल्या महिलांवर उपासमारीची वेळ आली आहे.



यावेळी जिल्हाधिकारी यांना देण्यात आलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले की मराठवाडा राष्ट्रीय बिडी मजदुर संघ इंटकच्या वतीने निवेदन सादर करून मागणी करण्यात येत आहे की, आपण विडी कामगारांनी केलेल्या कामाची ७ महिण्यापेक्षा जास्त दिवसाच्या केलेल्या कामाची मजुरीचे पैसे बेकायदेशीररित्या रोखुन ठेवले असता बिडी कामगारांनी आंदोलनाचे मार्ग स्विकारल्याने आपण माजी आमदार कैलाश गोरंट्याल यांच्या मध्यस्थिने अर्धे मजुरीचे पैसे येत्या तिन महिण्यात कामगारांना वाटप करण्याचे मान्य केल्यानंतर होणारे आंदोलन थांबवले होते.

तरी गेल्या पाच महिण्यात झालेल्या कराराची पुर्तता न करता कामगारांना तिन महिण्याची मजूरीचे वाटप न करता फक्त दोन महिण्याच्या कामाचे पैश्याचे वाटप करून करार मोडला आहे. यामुळे बिडी कामगारात आक्रोश पसरलेला आहे.

बेरोजगारी व उपासमारीने त्रस्त बिडी कामगारांना त्यांनी केलेल्या कामाचे पैश्याचे वाटप बागलपंडूकसणाच्या आठ दिवसापुर्वी त्यांना वाटप करण्यात यावे, नसता बिडी कामगारांना आंदोलनाचे मार्ग स्विकाराचे लागेल व नाविलाजास्तव न्याय मिळविण्यासाठी योग्य त्या ठिकाणी दाद मागावी लागेल असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे

यावेळी पुष्पा गरदस, संतोषी बल्लेवार, सुनीता गवडेवार, उमा चित्राल, मनिषा शेरला, सायनना चिलवर, जिला इंटक संगठनचे अध्यक्ष डॉ राधेश्याम जयसवाल यांची उपस्थिती होती.

## त्या बदल्यात विशेष रजा मंजूर करा; मराठवाडा शिक्षक संघाची मागणी

**टेंभूर्णी । प्रतिनिधी -** दिर्घ सुट्टीच्या कालावधीत राज्यभर वरिष्ठ व निवड श्रेणी प्रशिक्षण घेण्यात आलेले होते या कालावधीत अनेक प्रशिक्षणार्थी शिक्षक व सुलभकांना दीर्घकालीन सुट्टीच्या कालावधीत हे प्रशिक्षण पूर्ण करावे लागले याबद्दल त्या सर्व शिक्षकांना व सुलभकांना विशेष रजा प्रदान करण्यात यावी याकरिता चंद्रकांत चव्हाण जिल्हा सचिव मराठवाडा शिक्षक संघ यांच्या नेतृत्वाखाली निवेदन सादर करण्यात आले यावेळी विभागीय उपसंचालक कार्यालय छत्रपती संभाजीनगर येथे एकही अधिकारी कार्यालयीन कामकाज पाहण्यासाठी उपस्थित नव्हते, यावेळी संघटनेचे पदाधिकारी नवनाथ मंत्री, अजय कदम, अशोक ढमढेरे, विलास चांदणे, विनोद केनेकर, विलास चव्हाण, बाळू पवार, डॉ. पद्माकर पगार, संतोष सुरडकर, रावसाहेब बोरसे, अजित जाधव, मानसी भागवत, अरुणा चौधरी, शितल कवडे, सोनाली गव्हाणे, स्वाती बोंडे उपस्थित होते.

# केमिस्ट असोसिएशनच्या वतीने डॉ. संजय पुरी यांचा सत्कार



**परतूर । प्रतिनिधी -** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या वतीने दिला जाणारा फुले,शाहू,आंबेडकर पुरस्कार डॉ.संजय पुरी यांना मिळाल्या बद्दल परतूर केमिस्ट असोशियनच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.भटके विमुक्त विकास प्रतिष्ठानच्या माध्यमातून केलेल्या कार्याची दखल घेत डॉ. पुरी यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. वैद्यकीय क्षेत्रात कार्यरत राहून समांतर पद्धतीने डॉ. पुरी यांनी आपले सामाजिक कार्य पुढे नेल्या बद्दल केमिस्ट असोसिएशनच्या वतीने डॉ. पुरी यांचा विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी केमिस्ट असोसिएशनचे तालुकाध्यक्ष दत्ता गिरी, निहित सकलेचा, जेष्ठ सदस्य जुगलकिशोर सोमाणी, गोविंद मालपाणी,ज्ञानेश्वर झोरे,अनिल तेलगड,अतुल पोरवाल, दत्ता सोळंके, माऊली भापकर यांच्या इतर पदाधिकारी उपस्थित होते.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.